जावक क्र.  ८९६९/२०२३
विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे
दि.०४/०८/२०२३

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
यांना सविनय सादर

प्रतिवेदक : राहुल राजकुमार सोनार, पोलीस नाईक/७५८७, विश्रामबाग पो.स्टेशन पुणे.
यांजकडुन विनंतीपुर्वक की,

विषय : बेवारस मयत अनोळखी इसमाचा व त्याच्या नातेवाईकांचा तपास होणेकामी माहिती प्रसिद्धी होणेबाबत...

संदर्भ : विश्रामबाग पो. स्टे अकस्मात मयत रजि. नं. ४९/२०२३ फौ.प्र.सं.कलम १७४ दि.३०/०७/२०२३

---

विश्रामबाग पो. स्टे अकस्मात मयत रजि.नं.४९/२०२३ फौ.प्र.सं.कलम १७४ दि.३०/०७/२०२३ रोजी २०.४२ वा.अन्वये दाखल मयतातील मयत अनोळखी पुरुष वय अंदाजे ५० वर्षे हा खालकर मारुती मंदिराजवळ,सदाशिव पेठ,पुणे येथे बेशुद्धावस्थेत मिळुन आल्याने त्यास ॲम्बुलन्स मार्फत उपचारकामी ससुन हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांस उपचारापुर्वी दि. ३०/०७/२०२३ रोजी ०२.१० वा. मयत झाल्याचे घोषित केले त्यास ससुन डेड हाऊस येथे नेले असता,त्याचे एम.एल.पी.एम.नं ४४७८/२०२३ अन्वये पोस्टमार्टेम झाले असुन मयताचे कारण दिले "INTRAVENTRICULAR HEMORRAGE"असुन त्याचा एम.एल.सी.नं. १८७०७/२०२३ असा असुन मृतदेह हा ससुन हॉस्पीटल डेड हाऊस मध्ये ठेवला होता. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे,



बेवारस पुरुष इसम वय अंदाजे ५० वर्षे, नाव,पत्ता माहित नाही, डोक्यावर केस,दाढी-मिश्या-साधारण पांढ-या , नाक-सरळ,नाकपुड्या, डोळे-काळे पांढरे, चेहरा उभट, रंग-सावळा, सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच ,हात पाय शाबुत आहे.अंगाणे साधारण

तरी दाखल मयताचे नावाचा व त्याचे वारसांचा तपास होणेकामी सर्व वृत्तपत्रामध्ये मयताचे वर्णन फोटोग्राफ छपाई होणेस विनंती आहे. संपर्क क्र. विश्रामबाग पो.स्टे.पुणे ०२०-२४४५७७५०

मा.सादर व्हावे
दि.०४/०८/२०२३
(आर.आर.सोनार)
पोलीस नाईक/७५८७
विश्रामबाग पो.स्टे.पुणे शहर